तरुण भारत

रविवार २९ डिसेंबर २०२४

# शिष्यवृत्तीतून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला प्रेरणा

## कवी प्रा. अरुण म्हात्रे यांचे प्रतिपादन : विवेकानंद कॉलेजमध्ये शिष्यवृत्ती वितरण समारंभ उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने सामान्य माणसाच्या लिहित्या हातांना बळ दिले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मातीशी नाळ जोडून आपली संस्कृती जोपासली पाहिजे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शैक्षणिक कार्याचा चढता आलेख महाराष्ट्राला ज्ञात आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षण क्षेत्रात क्रांती केली म्हणूनच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आले. त्यामुळे गुणवत्ता शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बौध्दिक क्षमतेला प्रेरणा मिळत राहते, असे प्रतिपादन कवी अरुण म्हात्रे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे गुणवत्ता शिष्यवृत्ती वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे होते.

कवी म्हात्रे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे काव्यमय चरित्र लिहिणे ही माझी नैतिक जबाबदारी आहे. स्वतंत्र




**कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे गुणवत्ता शिष्यवृत्ती वितरण सोहळयात मार्गदर्शन करताना कवी प्रा. अरुण म्हात्रे. सोबत संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. संदीप पाटील आदी.**

शिष्यवृत्ती देणारे विवेकानंद कॉलेज हे महाराष्ट्रातील पहिले महाविद्यालय आहे. ज्यांच्या घरात पुस्तकांचे कपाट आहे ते सर्वात श्रीमंत घर असते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी याच वयात ज्ञानार्जन करावे व आपले भविष्य सुखकारक घडवावे, असे सांगितले. तसेच कवी म्हात्रे यानी मंगेश पाडगावकर, फ. मुं. शिंदे, सुरेश भट, नारायण सुर्वे, प्रदीप निफाडकर, विठ्ठल वाघ, महेश केळूसकर यांच्या कवितांसह स्वतःच्या कविता आणि गीते सुमधूर आवाजात सादर केली.

अध्यक्षस्थानावरून गावडे म्हणाले, विवेकानंद कॉलेजने कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात अनेक नामवंत विद्यार्थी देशसेवेसाठी दिले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांची धुरा मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी सांभाळली आहे. त्यांच्या शाळेतच माझ्यासारख्या कित्येकांची जडणघडण झाली आहे. बापूजींचा हा वैचारिक वारसा पुढील पिढीने जोपासावा.

सागर चव्हाण, डॉ. एस. व्ही. काकतकर, डॉ. एस. आर. पाटील, प्राचार्य डी. ए. पाटील, माजी प्राचार्य कणबरकर कुटुंबीय, प्रा. माधवी चरणकर, बी. एन. पाटील, डॉ. आर. एस. पाटील, राहूल हत्ती कुटुंबीय, प्रा ए. एस. कदम यांनी महाविद्यालयात दिलेल्या ठेवीतून विद्यार्थ्यांना पारितोषिकेही दिली. प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. संदीप पाटील यांनी करुन दिली. आभार परीक्षा नियंत्रक डॉ. जी. जे. नवाथे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. समीक्षा फराकटे व प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. यावेळी प्रा. एस. पी. थोरात, परीक्षा नियंत्रक डॉ. जी. जे. नवाथे, डॉ. श्रुती जोशी, डॉ. कैलास पाटील, प्रा. शिल्पा भोसले, प्रा. एम. आर. नवले उपस्थित होते.